**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील स्थापत्य शाखा (३४ संवर्गाच्या आतील पदांचा) सुधारित आकृतीबंधातील शिपाई व चौकीदार (गट-ड) संवर्गातील पदे अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्र.ईएसटी-२०१७/प्र.क्र.३२/प्रशासन-१**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :-१९ जानेवारी, २०२६.**

<u>संदर्भ</u> :- १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दि.१० ऑक्टोबर, २०२३.
२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि २०२२/ प्र.क्र.१५/ आ.पु.क. दि. ०८ ऑगस्ट, २०२४.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. दि.१७ जुलै, २०२५.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/ म.लो.आ. दि. १७ जुलै, २०२५.
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र. अंकपा-१२२५/ प्र.क्र.१९४/म.लो.आ. दि. ११ सप्टेंबर, २०२५.
६) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे जावक क्र. मुअ (पुणे) /आस्था-१ /७७५९/२०२५, दि.११ डिसेंबर, २०२५.
७) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे जावक क्र. आस्था-६ /गट-क व गट-ड अनुकंपा /९३६६/२०२५, दि.१४ डिसेंबर, २०२५.
८) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे जावक क्र. का.४/सेवा-४/४२९५/२०२५, दि.२६ सप्टेंबर, २०२५.
९) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांचे जावक क्र.४७८६/ आस्था/ वलि-२/२०२५, दि.१४ ऑक्टोबर, २०२५.

**<u>प्रस्तावना :-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली स्थापत्य शाखा (३४ संवर्गाच्या आतील पदांचा) या कार्यालयाचा सुधारीत आकृतीबंध दि.१० ऑक्टोबर, २०२३ रोजी मंजूर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधात गट-ड संवर्गातील शिपाई व चौकीदार हे संवर्ग “मृत संवर्ग” घोषित करण्यात आले आहेत.

तद्‌नंतर वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०८ ऑगस्ट, २०२४ अन्वये दि.१३ जुलै, २०२१ या दिनांकानंतर मान्यता देण्यात आलेल्या आकृतीबंधात मृत ठरविलेल्या वाहनचालक व गट-ड संवर्गातील अनुकंपा नियुक्त्यांसंदर्भात आवश्यक तितकी नियमित पदे राखीव ठेवण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत.

तद्पश्चात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि. १७ जुलै, २०२५ अन्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक धोरण निश्चित केले आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, दि. १७ जुलै, २०२५ व दि.११ सप्टेंबर, २०२५ अन्वये अनुकंपा नियुक्ती संदर्भात सर्वसमावेशक सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने आकृतीबंधात मृत ठरविलेल्या गट-ड संवर्गातील जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे, त्या पदसंख्येच्या मर्यादेत प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेवून तेवढी पदे अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिपत्याखालील मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या अधिनस्त कार्यालयातील **शिपाई गट-ड संवर्गातील १५ पदे व चौकीदार गट-ड संवर्गातील १२ पदे अशी एकूण २७ पदे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेता खाली दर्शविलेल्या विवरणपत्रानुसार** अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

> **“गट-ड च्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेला कर्मचारी हा पदोन्नत झाल्यामुळे अथवा सेवानिवृत्त झाल्यामुळे अथवा इतर कारणामुळे हे पद रिक्त झाल्यास ते नियमित पद व्यपगत होईल.”**

विवरणपत्र

| अनुकंपा नियुक्ती साठी गट-ड च्या प्रतिक्षासूचीतून पुनर्जीवित करावयाची पदे | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | नियुक्ती प्राधिकारी कार्यालयाच्या प्रतिक्षासूचीवर प्रलंबित उमेवारांची संख्या | साप्रवि शासन परिपत्रक, दि.११ सप्टेंबर, २०२५ अन्वये गट-ड संवर्गातील पुनर्जीवित करण्यात आलेल्या पदास कार्योत्तर मंजूरी प्रदान करणे |
| **मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे** | | | | |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | | | | |
| १ | चौकीदार | ३४ | १ | १ |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा | | | | |
| १ | चौकीदार | २६ | १ | १ |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे | | | | |
| १ | चौकीदार | ४७ | ६ | ६ |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर | | | | |
| १ | चौकीदार | २२ | ४ | ४ |
| **एकूण** | | | **१२** | **१२** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर** | | | | |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर | | | | |
| १ | शिपाई | १४७ | ५ | ५ |
| **मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,अमरावती** | | | | |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला | | | | |
| १ | शिपाई | ८५ | ६ | ६ |
| **मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक** | | | | |
| अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक | | | | |
| १ | शिपाई | ११६ | ४ | ४ |
| **एकूण** | | | १५ | १५ |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०११९१२३०४६०७१८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RANJIT SHIVAJIRAO AHIRE

Digitally signed by RANJIT SHIVAJIRAO AHIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, 2.5.4.20=1abde6c83c28d6dbd9f52f359ea16d2e960f16f7ca457601da7303357626d5f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7695265D501491899F1C290C5FAC1C7252F8D5F4D75CE48B86577435F1F4D615, cn=RANJIT SHIVAJIRAO AHIRE
Date: 2026.01.19 12:31:41 +05'30'

( रणजीत अहिरे )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे, पुणे/ सातारा/ कोल्हापूर/ सोलापूर / नागपूर / नाशिक/ अकोला.

**प्रत :-**

१) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल -२ (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर मुख्य सचिव (सा.बां.) / सचिव (रस्ते) / सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) जिल्हा व कोषागार अधिकारी, पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, नागपूर, अकोला, नाशिक.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प-१ व अर्थसंकल्प-३, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती